एमएमआरडीए
MMRDA

# मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

## MUMBAI METROPOLITAN REGION DEVELOPMENT AUTHORITY

# अर्थसंकल्पीय अंदाज
# २०२१-२२



**मुंबई महानगर प्रदेशाचा सर्वांगीण विकास**

# मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण १५० वी बैठक

**दिनांक :**

**बाब क्र. : सन २०२१-२०२२ चे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक**

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम २३ (१) आणि त्यासोबत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण नियम १९७६ मधील नियम ४ अन्वयें नेमून दिल्याप्रमाणे मुंबई महानगर प्रदेश विकास (मुंमप्रवि) निधीचे २०२१-२०२२ सालाचे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक आणि सन २०२०-२०२१ चे सुधारीत अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक स्पष्टीकरणासह या बाब टिप्पणीसोबत सादर केलेले आहेत.

२) मुंबई नागरी विकास प्रकल्प (MUDP) – फिरता निधी तसेच महानगर (MEGACITY) योजना – फिरता निधी करीता केलेले २०२१-२०२२ चे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक व २०२०-२०२१ चे सुधारीत अंदाजपत्रक देखील या बाब टिप्पणीसोबत सादर केलेले आहेत.

३) प्राधिकरणातर्फे परिवहन प्रकल्पांवरील अभ्यास, सर्वेक्षणे तसेच परिवहन प्रकल्पांची अंमलबजावणी करण्यात येते. कुलाबा-वांद्रे-सीप्झ (मेट्रो रेल्वे लाईन – ३) प्रकल्प वेळेत पूर्ण होण्याकरीता त्यांचा अंमलबजावणीचा वेग व गती वाढविण्यासाठी तसेच अंमलबजावणी करण्याकरीता मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन (MMRC) ची स्थापना करण्यात आली आहे. २०२१-२२ या वर्षात सदर कंपनीकडे मेट्रो प्रकल्प राबविण्याकरीता आवश्यक ती रक्कम प्राधिकरणातर्फे हस्तांतरीत करण्यात येईल.

४) मुंबई महानगर प्रदेशातील मेट्रो प्रकल्पाचे संचलनाचे काम करण्यासाठी महा मुंबई मेट्रो संचालन महामंडळाची MMMOCLची स्थापना दि.१०/०६/२०१९ रोजी करण्यात आली आहे. नजीकच्या भविष्यात मेट्रोलाईन्स सुरु करण्याचे लक्ष ठेवून प्राधिकरणाच्या अंतर्गत स्वतंत्र संचालन व देखभाल महामंडळाची स्थापना करण्यात आलेली आहे. हे महामंडळ मंबई महानगर प्रदेशातील सर्व मेट्रो महामार्गाचे संचालनाचे कामे करणार आहे. या वर्षात मेट्रो मार्ग २ अ दहिसर - डी.एन नगर (अंधेरी) व मेट्रो मार्ग ७ दहिसर पूर्व – अंधेरी पूर्व या मार्गावर प्रवासी सेवा सुरु होणार असल्याने कंपनी संचालनाकरीता आवश्यक ती रक्कम प्राधिकरणातर्फे हस्तांतरित करण्यात येईल.

५)	अर्थसंकल्पात वित्तीय तरतूद करण्यात आलेली नसतानाही काही योजना आणि सर्वेक्षणे हाती घेणे, अकल्पित स्वरुपाचा खर्च करावा लागणे इत्यादी गोष्टी करणे आवश्यक ठरते असेही काही प्रसंग वर्षभरात उद्भवतात. अशा वेळी प्राधिकरणाला पुरवणी अर्थसंकल्प सादर केला जाईतोवर थांबणे व्यवहार्य नसते. तेव्हा महानगर आयुक्त यांना प्रत्येकी अंदाजे रु. १ कोटी पेक्षा कमी खर्च असलेल्या आणि कार्यक्रम अहवालात समाविष्ट न केलेल्या बाबी मंजूर करण्याचे आणि संमत अर्थसंकल्पात अंतर्भाव नसलेल्या तेवढयाच व्यय मर्यादेपर्यंत खर्च प्राधिकृत करण्याचे अधिकार कृपया प्रदान करण्यात यावेत.

६)	मागील पानावर नमूद केलेल्या बाबींचा कृपया विचार करावा आणि त्या मान्य असल्यास कृपया पुढील ठराव मंजूर करावेत.

**असा ठराव करण्यात येत आहे की,** "मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम २३ (१) अन्वयें प्राधिकरणाच्या अंदाजित जमा रु.९८३३.७५ कोटी व खर्च रु.१२९६९.३५ कोटी दर्शविणारा २०२१-२०२२ सालाचा अर्थसंकल्प आणि २०२०-२०२१ सालचे सुधारीत अंदाजपत्रक मंजूर करण्यात येत आहे."

**आणखी असाही ठराव करण्यात येत आहे की,** "प्राधिकरण याद्वारे मुंबई नागरी विकास प्रकल्प – फिरता निधी अंदाजित जमा रु.२१४.९५ कोटी व खर्च रु.१०.०० कोटी आणि महानगर योजना – फिरता निधी यांचे अंदाजित जमा रु.५२.६८ कोटी व खर्च रु.६२.९२ कोटी दर्शविणारे सन २०२१-२०२२ चे अर्थसंकल्पीय अंदाज व २०२०-२०२१ चे सुधारीत अंदाज यांस मंजूरी देत आहे."

**आणखी असाही ठराव करण्यात येत आहे की,** "प्राधिकरण याद्वारे योजना, सर्वेक्षणे इत्यादी कार्यक्रम अहवाल आणि मंजूर अर्थसंकल्पात समाविष्ट न केलेल्या प्रत्येकी रु. १ कोटी पेक्षा कमी असलेल्या बाबींना मंजूरी देण्याचा / खर्च करण्याचा अधिकार महानगर आयुक्त यांना प्रदान करण्यात येत आहे."

***************

# मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या
# २०२१-२०२२ सालाच्या अर्थसंकल्पावरील स्पष्टीकरणात्मक टिप्पणी.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम १८ अन्वयें निधी उभारण्याची तरतूद असून अशा निधीला मुंबई महानगर प्रदेश विकास निधी (मुं.म.प्र.वि.निधी) असे संबोधण्यात येते. प्राधिकरणाच्या ठराव क्र. ३९८ व ६४५ अन्वयें अनुक्रमे मुंबई नागरी विकास प्रकल्प — फिरता निधी व महानगर योजना — फिरता निधी स्थापन करण्यात आलेले आहेत.

२. या प्राधिकरणाचे अर्थसंकल्पीय अंदाज ज्या प्र-नमुन्यात तयार करावयाचे असतात त्यास, शासनाने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ अंतर्गत मुं.म.प्र.वि.प्राधिकरण नियम, १९७६ हे नियम तयार करुन मान्यता दिली आहे. सदर नियमान्वयें प्राधिकरणाच्या विविध विभागाखाली तरतूद करण्यात आली आहे.

प्राधिकरणाच्या सन २०२१-२०२२ या वर्षी अंदाजित असलेल्या एकूण जमा रकमा सुमारे रु.९८३३.७५ कोटी इतक्या आहेत आणि रु.१२९६९.३५ कोटीच्या अंदाजित खर्चाचा विचार करता रु.३१३५.६० कोटीची तुट दर्शविण्यात आलेली आहे.

सन २०२१-२०२२ चा संक्षिप्त अर्थसंकल्प पुढीलप्रमाणे आहे.

(रुपये कोटीत)

| **जमा** | | |
|---|---|---|
| १. | राज्य शासनाकडून मिळणा-या जमा रकमा (अनुसूची - अ) | ३६०.०० |
| २. | भू-विक्री पासून जमा (अनुसूची — ब) | ८२०.६५ |
| ३. | कर्जाऊ रकमा (अनुसूची - क) | ५४८०.२५ |
| ४. | ठेवींवरील व्याज व इतर जमा रकमा (अनुसूची — ड) | २१६६.४५ |
| ५. | शासनाचे अनुदान / विकास हक्क हस्तांतरण (भाग - १) | ५०६.४० |
| ६. | नागरी परिवहन निधी (UTF) (भाग - १) | ५००.०० |
| | **एकूण :** | **९८३३.७५** |
| **वजा — खर्च** | | |
| १. | प्रशासकीय खर्च (अनुसूची — १) | ४९१.१५ |
| २. | इमारत / संगणक खरेदी / फर्निचर (अनुसूची - २) | ५७.४५ |
| ३. | स्थानिक संस्थांना कर्जे व इतर खर्च (अनुसूची - ३) | २७३.२० |
| ४. | सर्वेक्षणे व अभ्यास (अनुसूची — ४) | ३४.९० |
| ५. | अनुदाने (अनुसूची - ५) | १४०.४५ |
| ६. | प्रकल्पांवरील खर्च (अनुसूची - ६) | ११९७२.२० |
| | **एकूण :** | **१२९६९.३५** |
| | **तूट** | **३१३५.६०** |

२०२१-२०२२ च्या जमा व खर्चाचा आढावा खाली दिल्याप्रमाणे.

(रुपये कोटीत)

| प्रत्यक्ष २०१९-२० | अर्थसंकल्पीय अंदाज २०२०-२१ | शिर्षक | सुधारीत अंदाज २०२०-२१ | अर्थसंकल्पीय अंदाज २०२१-२२ |
|---|---|---|---|---|
| ९३९६.२५ | १२५४९.१५ | जमा | ७८२६.०५ | ९८३३.७५ |
| १००८८.३१ | १५८१९.४५ | खर्च / कर्जे | ९८५१.९२ | १२९६९.३५ |
| (-) ६९२.०६ | (-) ३२७०.३० | आधिक्य / तूट (+) (-) | (-)२०२५.८७ | (-)३१३५.६० |

## जमा (अर्थसंकल्प भाग — १)

२०२१-२२ सालाच्या जमा रकमांचा अर्थसंकल्पीय अंदाजासह २०२०-२१ सालाचे अर्थसंकल्पीय अंदाज आणि सन २०२०-२१ चे सुधारीत अंदाज यामधील तफावतीची एकंदर रु.४७२३.१० कोटीची तूट दर्शविणारा तक्ता खाली सादर करण्यात आलेला आहे.

(रुपये कोटीत)

| विवरण | अर्थसंकल्पीय अंदाज २०२०-२१ | सुधारीत अंदाज २०२०-२१ | तफावती | अर्थसंकल्पीय अंदाज २०२१-२२ |
|---|---|---|---|---|
| १. राज्य शासनाकडून मिळणा-या जमा रकमा | ८१०.०० | २७८.०० | (-) ५३२.०० | ३६०.०० |
| २. जमिन विक्री | २३५३.६५ | २२३५.५० | (-) ११८.१५ | ८२०.६५ |
| ३. कर्जाऊ रकमा | ५०००.०० | २८३८.०० | (-) २१६२.०० | ५४८०.२५ |
| ४. इतर जमा — विकास आकारासहीत | २४१८.१० | ११९९.५५ | (-) १२१८.५५ | २१६६.४५ |
| ५. शासनाचे अनुदान/ विकास हक्क हस्तांतरण | ४५७.४० | ७५.०० | (-) ३८२.४० | ५०६.४० |
| ६. नागरी परिवहन निधी (UTF) | १५१०.०० | १२००.०० | (-) ३१०.०० | ५००.०० |
| **एकूण** | **१२५४९.१५** | **७८२६.०५** | (-) **४७२३.१०** | **९८३३.७५** |

**<u>जमा रक्कमांच्या प्राप्तीमध्ये घट होण्याची कारणे :-</u>**

**१. राज्य शासनाकडून मिळणा-या जमा रकमा :-**

(रुपये कोटीत)

| | अर्थसंकल्पातील तरतूद | | |
|---|---|---|---|
| **राज्य शासनाकडून मिळणा-या जमा रकमा** | **२०२०-२१** | **२०२०-२१ (सुधारीत)** | **२०२१-२२** |
| | **८१०.००** | **२७८.००** | **३६०.००** |

शासन निर्णयानुसार मेट्रो प्रकल्पाच्या अंमलबजावणी करीता राज्य व केंद्र शासनाकडून कर दुय्यम कर्ज म्हणून प्राधिकरणास प्राप्त होणार आहे. सन २०२०-२१ च्या मुळ अर्थसंकल्पानुसार सदर लेखाशिर्षाखाली रु.८१०.०० कोटी प्राप्त होणार होते परंतू राज्य शासनाकडून दुय्यम कर्ज या लेखाशिर्षाखाली २०२०-२१ या वर्षात रु.२७८.०० कोटी प्राप्त होतील अशी अपेक्षा आहे. त्यामुळे सुधारीत अर्थसंकल्पात रु.२७८.०० कोटीची तरतूद करण्यात आलेली आहे. तसेच सन २०२१-२२ या अर्थसंकल्पीय वर्षात सदर लेखाशिर्षाखाली प्राधिकरणास रु.३६०.०० कोटी इतके दुय्यम कर्ज प्राप्त होईल असे अपेक्षित आहे. त्यामुळे सन २०२१-२२ च्या अर्थसंकल्पात रु.३६०.०० कोटीची तरतूद प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

**२. जमिन विक्री :-**

(रुपये कोटीत)

| | अर्थसंकल्पातील तरतूद | | |
|---|---|---|---|
| **जमिन विक्री** | २०२०-२१ | २०२०-२१ (सुधारीत) | २०२१-२२ |
| | **२३५३.६५** | **२२३५.५०** | **८२०.६५** |

सन २०२०-२१ च्या अर्थसंकल्पात जमिन विक्रीपोटी वांद्रे-कुर्ला संकुलाच्या अतिरिक्त बांधकाम क्षेत्र धरुन रु.२०३३.०० कोटी इतकी रक्कम प्राप्त होईल अशी अपेक्षा होती. तथापि, सन २०२०-२१ या आर्थिक वर्षात वांद्रे-कुर्ला संकुलातील जमिनीच्या अतिरिक्त बांधकाम क्षेत्राच्या विक्रीपोटी रु.२१७.१९ कोटी व इतरत्र भूखंड विक्रीतून रु.३.९३ कोटी अशी एकूण रु.२२१.१२ कोटी रक्कम जमिन विक्रीपोटी माहे जानेवारी, २०२१ पर्यंत प्राप्त झालेली आहे. वांद्रे कुर्ला संकुल येथील अतिरिक्त बांधकाम क्षेत्राच्या व वडाळा ट्रक टर्मिनल येथील उर्वरीत भूखंड विक्रीच्या हप्त्याच्या रक्कमा माहे मार्च, २०२१ पर्यंत प्राप्त होतील असे अपेक्षित आहे. प्राप्त झालेल्या रक्कमा व माहे मार्च, २०२१ पर्यंत अपेक्षित रक्कमांचा विचार करता जमिन विक्रीपोटी रु.२२३५.५० कोटी सुधारीत अंदाजात प्रस्तावित करण्यात आले आहेत.

सन २०२१-२२ मध्ये वांद्रे-कुर्ला संकुलातील अतिरिक्त बांधकाम क्षेत्र देण्याचे व भुखंड विक्री करण्याचे प्रस्तावित केल्याने रु.५००.०० कोटी इतकी रक्कम प्राप्त होईल अशी अपेक्षा आहे. तसेच वडाळा ट्रक टर्मिनल येथील वाणिज्य केंद्राच्या जमिन विक्रीपोटी रु.३१०.६५ कोटी व इतर जमिन विक्री पासून रु.१०.०० कोटी प्राप्त होतील असे अपेक्षित आहे. त्यामुळे सन २०२१-२२ च्या अर्थसंकल्पात सदर लेखाशीर्षाखाली रु.८२०.६५ कोटीची तरतूद करण्यात आलेली आहे.

३. <u>कर्जाऊ रकमा :-</u>

(रुपये कोटीत)

| | अर्थसंकल्पातील तरतूद | | |
|---|---|---|---|
| आंतरराष्ट्रीय संस्थांकडून कर्ज | २०२०-२१ | २०२०-२१ (सुधारीत) | २०२१-२२ |
| | ५०००.०० | २८३८.०० | ५४८०.२५ |

प्राधिकरण विविध मेट्रो रेल्वे प्रकल्प तसेच मुंबई पारबंदर छन्नमार्ग असे महत्वाचे पायाभूत सुविधा प्रकल्प राबवित आहे. सदर प्रकल्पांकरीता मोठया प्रमाणात निधीची गरज भासणार आहे. म्हणून प्राधिकरणाने ADB/AIIB/JICA या आंतरराष्ट्रीय संस्थांकडून कर्ज घेण्याचे ठरविले आहे. एमटीएचएल या प्रकल्पासाठी JICA कडून मिळणा-या कर्जाच्या करारनाम्याचे मागील वर्षी अंतिमीकरण झालेले असून माहे जानेवारी, २०२१ पर्यंत रु.९५४.५९ कोटी इतके कर्ज प्राप्त झाले आहे. एमटीएचएल या प्रकल्पाचा वेग व प्रगती लक्षात घेता मार्च, २०२१ पर्यंत JICA कडून एकूण रु.१२८८.०० कोटी कर्ज रुपाने प्राप्त होतील असे अपेक्षित आहे. त्यामुळे सुधारीत अर्थसंकल्पात सदर लेखाशीर्षाखाली रु.१२८८.०० कोटीची तरतूद करण्यात आलेली आहे. मेट्रो प्रकल्पाकरीता ADB/NDB यांचेकडून मार्च, २०२१ पर्यंत कर्जाच्या रुपाने रु.१५५०.०० कोटी प्राप्त होतील असे अपेक्षित आहे. त्यामुळे सुधारीत अंदाजात सदर लेखाशिर्षाखाली रु.१५५०.०० कोटीची तरतूद करण्यात आली आहे. पुढील वर्षी एमटीएचएल व मेट्रो या प्रकल्पांची कामे अधिक गतीने होणार असल्यामुळे सदर प्रकल्पास कर्ज देखील मोठया प्रमाणात घ्यावे लागेल. हे गृहीत धरुन सन २०२१-२२ साठी सदर लेखाशिर्षाखाली रु.५४८०.२५ कोटीची तरतूद करण्यात आली आहे.

४. <u>इतर जमा :-</u>

४.१ ठेवीवरील व्याज :-

(रुपये कोटीत)

| | अर्थसंकल्पातील तरतूद | | |
|---|---|---|---|
| ठेवीवरील व्याज | २०२०-२१ | २०२०-२१ (सुधारीत) | २०२१-२२ |
| | ७८४.०० | ३०५.०० | २९०.०० |

प्राधिकरणाकडे असलेल्या अतिरिक्त निधीची गुंतवणूक शासनाच्या गुंतवणूकीच्या मार्गदर्शक तत्वानुसार करण्यात येते. शासनाने माहे २७ ऑक्टोबर, २०१५ मध्ये निर्गमित केलेल्या शासन निर्णयातील मार्गदर्शक तत्वांनुसार प्राधिकरण अतिरिक्त निधी राष्ट्रीयकृत बँका, ट्रेझरी बिल, भारत सरकारच्या सेक्युरिटीज, यु.टी.आय.बँक, एच.डी.एफ.सी.बँक व आय.सी.आय.सी.आय.बँक यामध्ये गुंतवू शकते. सन २०२०-२१ या आर्थिक वर्षात ठेवीवरील व्याजाची रु.७८४.०० कोटी इतकी तरतूद करण्यात आली होती. तथापि, व्याजदरात बदलाने माहे जानेवारी, २०२१ अखेर रु.२२४.४३ कोटी व्याजापोटी प्राप्त झालेले आहेत. वाढीव व्याजदराचा विचार करता सुधारीत अंदाजपत्रकात

ठेवीवरील व्याजापोटी रु.३०५.०० कोटी इतकी तरतूद करण्यात आली आहे. सन २०२१-२२ या वर्षात प्राप्ती व खर्चाचा विचार करता उर्वरीत ठेवीवरील व्याजाची तरतूद रु.२९०.०० कोटी इतकी प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

शासनाच्या विविध संस्थेत/उपक्रमात शासनाच्या निर्देशानुसार प्राधिकरणाने निधी गुंतविला आहे. शासन व शासकीय उपक्रमात माहे जानेवारी, २०२१ अखेर ठेवीपोटी रु.६४४.७२ कोटी इतका निधी गुंतून पडला आहे. तसेच माहे जानेवारी, २०२१ अखेर सदर ठेवीवरील व्याजापोटी (दंडीत व्याज धरुन) एकूण रु.१७७२.२२ कोटी इतकी रक्कम शासकीय संस्थाकडून येणे आहे. कार्यकारी समितीस/प्राधिकरणाला शासनाच्या विविध संस्थांकडे येणे असलेल्या निधीचा अहवाल वेळोवेळी सादर करण्यात आलेला आहे. शासकीय संस्थांकडून प्राधिकरणाच्या ठेवी व व्याजाची रक्कम ज्यावेळी प्राप्त होईल त्यावेळी लेख्यात घेण्यात येईल. त्यामुळे या ठेवीवरील व्याज विचारात घेण्यात आलेले नाही.

### ४.२ <u>कर्जाची परतफेड :-</u>

(रुपये कोटीत)

| | अर्थसंकल्पातील तरतूद | | |
|---|---|---|---|
| | २०२०-२१ | २०२०-२१ (सुधारीत) | २०२१-२२ |
| **कर्जाची परतफेड** | **८९.४५** | **८९.२५** | **९५.७५** |

प्राधिकरणास सन २०२०-२१ या आर्थिक वर्षात कर्जाच्या परतफेडीपोटी रु.८९.४५ कोटीची रक्कम मिळेल असे अपेक्षित होते. त्यामध्ये बृहन्मुंबई महानगरपालिका, नवी मुंबई महानगरपालिका, नायर रुग्णालय, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका, ठाणे महानगरपालिका, मिरा-भाईंदर महानगरपालिका, कुळगांव-बदलापूर महानगरपालिका व वसई-विरार पाणीपुरवठा योजना या कर्जाचा समावेश होता. तथापि, माहे जानेवारी, २०२१ अखेर संबंधीत संस्थांकडून रु.७५.८० कोटी इतक्या कर्जाची परतफेड झालेली आहे. याचा विचार करता २०२०-२१ या वर्षात रु.८९.२५ कोटी ची सुधारीत तरतूद सदर लेखाशीर्षापोटी करण्यात आलेली आहे. पुढील वर्षाच्या अर्थसंकल्पात एकूण रु.९५.७५ कोटी इतक्या कर्जाच्या रक्कमेची परतफेड अपेक्षित आहे. सदरहू कर्जाच्या परतफेडीच्या रक्कमेमध्ये बृहन्मुंबई महानगरपालिका, नवी मुंबई महानगरपालिका यांना देण्यात आलेल्या कर्जाच्या परतफेडीचा तसेच नायर रुग्णालय, ठाणे महानगरपालिका, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका, कुळगांव-बदलापूर महानगरपालिका, मिरा-भाईंदर महानगरपालिका व वसई-विरार पाणीपुरवठा योजना यांना देण्यात आलेल्या कर्जाच्या परतफेडीचा देखील समावेश आहे.

## ४.३ कर्जावरील व्याज :-

(रुपये कोटीत)

| | अर्थसंकल्पातील तरतूद | | |
|---|---|---|---|
| | २०२०-२१ | २०२०-२१ (सुधारीत) | २०२१-२२ |
| कर्जावरील व्याज | ७६.१५ | ७२.७० | ६८.५० |

प्राधिकरणाच्या सन २०२०-२१ च्या वार्षिक अर्थसंकल्पात कर्जावरील व्याजापोटी रु.७६.१५ कोटी प्राप्त होतील असे अपेक्षित होते. यामध्ये बृहन्मुंबई महानगरपालिका, वसई-विरार पाणीपुरवठा योजना, नायर रुग्णालय, ठाणे महानगरपालिका, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका, कुळगांव-बदलापुर महानगरपालिका, मिरा-भाईंदर महानगरपालिका व नवी मुंबई महानगरपालिका यांना दिलेल्या कर्जावरील व्याजाचा समावेश होता. माहे जानेवारी, २०२१ अखेर रु.५३.७६ कोटी इतकी रक्कम कर्जावरील व्याजापोटी प्राप्त झाली आहे. माहे मार्च, २०२१ अखेरपर्यंत या अर्थसंकल्पीय वर्षात विविध संस्थांकडून एकूण रु.७२.७० कोटी इतकी रक्कम प्राप्त होईल. ही बाब विचारात घेता सुधारीत तरतूद रु.७२.७० कोटी करण्यात आलेली आहे. सन २०२१-२२ या वर्षात कर्जावरील व्याजापोटी रु.६८.५० कोटी प्राप्त होतील असे अपेक्षित आहे. त्यामध्ये बृहन्मुंबई महानगरपालिका रु.९.६५ कोटी, वसई-विरार पाणीपुरवठा योजना रु.५.४० कोटी, ठाणे महानगरपालिका रु.१४.०० कोटी, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका रु.२१.०५ कोटी, कुळगांव-बदलापूर महानगरपालिका रु.४.०० कोटी, मिरा-भाईंदर महानगरपालिका रु.३.२० कोटी व नवी मुंबई महानगरपालिका रु.११.२० कोटी इत्यादींचा समावेश आहे.

## ४.४ भू-भाडे, विकास आकार, सुरक्षा/इसारा व अनामत ठेवी, जाहिरातीमधून उत्पन्न, संकीर्ण जमा, पायाभूत सुविधा चार्जेस इ. :-

(रुपये कोटीत)

| | अर्थसंकल्पातील तरतूद | | |
|---|---|---|---|
| | २०२०-२१ | २०२०-२१ (सुधारीत) | २०२१-२२ |
| **भू-भाडे, विकास आकार, सुरक्षा/इसारा व अनामत ठेवी, जाहिरातीमधून उत्पन्न, संकीर्ण जमा, पायाभूत सुविधा चार्जेस इ.** | १३३४.१५ | ७२४.६० | १४४३.९५ |

यामध्ये कार्यालयीन भाडेपट्टा, भू-भाडे, विकास आकार, सुरक्षा/इसारा व अनामत ठेवी, संकीर्ण जमा, पायाभूत सुविधा चार्जेस व जाहिरातीमधून उत्पन्न इ. समावेश आहे. सन २०२०-२१ च्या अर्थसंकल्पात सदरहू लेखाशीर्षापोटी रु.१३३४.१५ कोटी इतकी रक्कम प्राप्त होईल असे अपेक्षित होते. तथापि, माहे जानेवारी, २०२१ अखेर रु.४५५.९१ कोटी इतकी रक्कम प्राधिकरणास प्राप्त झालेली आहे. यामध्ये सुरक्षा/इसारा व अनामत ठेवीपोटी रु.३४२.२४ कोटी, संकीर्ण जमा रक्कमा रु.४२.४७ कोटी, भू-भाडे व इतर भाडे रु.४१.३३ कोटी, पायाभूत सुविधा चार्जेस रु.८.४७ कोटी, ठेवी झोपडपट्टी पुनर्वसन योजना, विकास आकार व जाहिरातीमधून उत्पननापोटी रु.२१.४० कोटी यांचा समावेश आहे. मार्च, २०२१ अखेर या वर्षात सदर लेखाशीर्षापोटी रु.७२४.६० कोटी इतकी रक्कम प्राप्त होईल असे अपेक्षित आहे. सदर उत्पन्नातील वाढ ही संकीर्ण जमा रक्कमा, जमिन भाडेपट्टी वरील प्रलंबित व्याज व पायाभूत सोयी सुविधा चार्जेस

मधून अपेक्षित उत्पन्न प्राप्त झाल्यामुळे झालेली आहे. या सर्व बाबींचा विचार करता सन २०२०-२१ च्या सुधारित अर्थसंकल्पात जाहिरातीमधून मिळणारे उत्पन्न विकास आकार, भूई भाडे, पायाभूत सुविधा चार्जेस तसेच संकीर्ण जमा व सुरक्षा/इसारा व अनामत ठेवी या लेखाशीर्षाखाली रु.७२४.६० कोटी इतकी तरतूद करण्यात आलेली आहे.

सन २०२१-२२ च्या अर्थसंकल्पात या लेखाशीर्षाखाली रु.१४४३.९५ कोटींची तरतूद दर्शविण्यात आली आहे. यामध्ये प्रामुख्याने भू-भाडे, भाडे, भूखंड विक्रीचे हप्ते भूखंडधारकांकडून वेळेत प्राप्त न् झाल्यामुळे त्यावरील दंडीत व्याजापोटी व भूखंडधारकांनी भूखंडावरील प्रस्तावित बांधकाम वेळेत पूर्ण न केल्यामुळे त्यावरील दंडापोटी येणे असलेल्या रक्कमांचा समावेश आहे.

### ४.५ मोनोरेल मधून मिळणारे प्रवासी भाडे :-

(रुपये कोटीत)

| | अर्थसंकल्पातील तरतूद | | |
|---|---|---|---|
| | २०२०-२१ | २०२०-२१ (सुधारीत) | २०२१-२२ |
| **मोनोरेल मधून मिळणारे प्रवासी भाडे** | १४.३५ | ८.०० | २९.२५ |

मोनोरेल ने प्रवास करण्या-या प्रवाशांकडून दररोज तिकीट विक्रीच्या माध्यमातून भाडे मिळते. सन २०२०-२१ पासून मोनोरेल चे फेज - २ चे काम पुर्ण होऊन मोनोरेल ही जेकब सर्कल ते वडाळा व वडाळा ते चेंबूर अशी दोन फेज मिळुन एकत्र चालविण्यात येत आहे. त्यामुळे प्रवासी संख्या वाढुन प्रवाशांकडून मिळणारे भाडे हे निश्चितच जास्त येईल म्हणून मोनोरेल मधून मिळणारे प्रवासी भाडे या करीता वेगळे लेखाशिर्ष ठेवण्यात आले आहे. परंतू काही कारणांमुळे दुसरी फेज लवकर सुरु न झाल्याने सन २०२०-२१ या वर्षात जानेवारी, २०२१ पर्यंत फक्त रु.४.९० कोटी इतकेच उत्पन्न सदर लेखाशीर्षाखाली प्राप्त झाले आहे. त्यामुळे सन २०२०-२१ या वर्षात रु.८.०० कोटीची सुधारीत तरतूद सुचविण्यात आलेली आहे. पुढील वर्षात मोनोरेलच्या डब्यांच्या संख्येत वाढ होणार असल्याने व दोन्ही फेज एकत्रित धरुन मोनो रेल सुरु राहणार असल्याने प्रवासी संख्या वाढून प्रवासी भाडे देखील वाढणार आहे. या बाबीचा विचार करुन सन २०२१-२२ या अर्थसंकल्पीय वर्षात रु.२९.२५ कोटीची तरतूद करण्यात येत आहे.

### ४.६ महा मुंबई मेट्रो संचलन महामंडळ (M३) मधून मिळणारे उत्पन्न :-

(रुपये कोटीत)

| | अर्थसंकल्पातील तरतूद | | |
|---|---|---|---|
| | २०२०-२१ | २०२०-२१ (सुधारीत) | २०२१-२२ |
| **महा मुंबई मेट्रो संचलन महामंडळ (M३) मधून मिळणारे उत्पन्न** | १२०.०० | ०.०० | २३९.०० |

मुंबई महानगर प्रदेशातील मेट्रो प्रकल्पाचे संचलनाचे काम करण्यासाठी महा मुंबई मेट्रो संचालन महामंडळाची MMMOCLची स्थापना दि.१०/०६/२०१९ रोजी करण्यात आली आहे. नजीकच्या भविष्यात मेट्रोलाईन्स सुरु करण्याचे

लक्ष ठेवून प्राधिकरणाच्या अंतर्गत स्वतंत्र संचालन व देखभाल महामंडळाची स्थापना करण्यात आलेली आहे. हे महामंडळ मंबई महानगर प्रदेशातील (सिडको सहित) सर्व मेट्रो महामार्गाचे संचालनाचे कामे करणार आहे.

सन २०२०-२१ च्या अर्थसंकल्पामध्ये मेट्रो मार्ग २ अ व ७ सुरू होणे अपेक्षित असल्याने यामधून सुमारे रु.१२०.०० कोटी उत्पन्न अपेक्षित होते. तथापि, कोविड १९ महामारीमुळे मेट्रो मार्ग २ अ व ७ चे बांधकाम पुर्णत्वास जाऊ न शकल्याने जानेवारी, २०२१ पर्यंत काहीही उत्पन्न प्राप्त झाले नसून मार्च, २०२१ अखेरपर्यंत उत्पन्न मिळण्याची शक्यता नसल्याने सुधारीत अर्थसंकल्पात २०२०-२१ करीता उत्पन्न गृहित धरण्यात आलेले नाही. पुढील वर्षात मेट्रो मार्ग २ अ दहिसर - डी.एन नगर (अंधेरी) व मेट्रो मार्ग ७ दहिसर पूर्व – अंधेरी पूर्व या मार्गावर प्रवासी सेवा सुरु होण्याची शक्यता असल्याने सन २०२१-२२ मध्ये रु.२३९.०० कोटीचे उत्पन्न अपेक्षित आहे.

## ५. <u>शासन अनुदान, विकास हक्क हस्तांतरण इ. :-</u>

### ५.१ केंद्र शासनाकडून अंशदान (वसई-विरार पाणी पुरवठा) :-

(रुपये कोटीत)

| | अर्थसंकल्पातील तरतूद | | |
|---|---|---|---|
| | २०२०-२१ | २०२०-२१ (सुधारीत) | २०२१-२२ |
| केंद्र शासनाकडून अंशदान (वसई विरार पाणी पुरवठा) | १.०० | ७५.०० | ५०.०० |

प्राधिकरण राबवित असलेल्या वसई-विरार पाणीपुरवठा - सुर्या प्रकल्प या योजनेची केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियानांतर्गत निवड झालेली आहे. सदर प्रकल्पाकरीता केंद्र शासनाकडून प्राधिकरणास सन २०२०-२१ या वर्षात जानेवारी, २०२१ पर्यंत रु.७५.०० कोटी इतके अनुदान प्राप्त झाले आहे. त्यामुळे सुधारीत अर्थसंकल्पात केंद्र शासनाचे अनुदान (वसई-विरार पाणी पुरवठा - सुर्या प्रकल्प) म्हणून रु.७५.०० कोटीची सुधारीत तरतूद करण्यात आलेली आहे.

तसेच सन २०२१-२२ मध्ये सदर योजनेतंर्गत केंद्र शासनाकडून प्राधिरकणास रु.५०.०० कोटी इतके अंशदान अपेक्षित आहे. त्यामुळे पुढील वर्षीच्या अर्थसंकल्पात रु.५०.०० कोटीची तरतूद सदर लेखाशिर्षाखाली करण्यात आलेली आहे.

### ५.२ विकास हक्क हस्तांतरण (TDR) :-

(रुपये कोटीत)

| | अर्थसंकल्पातील तरतूद | | |
|---|---|---|---|
| | २०२०-२१ | २०२०-२१ (सुधारीत) | २०२१-२२ |
| विकास हक्क हस्तांतरण | ४५६.४० | ०.०० | ४५६.४० |

ठाणे महानगरपालिकेच्या रस्ते सुधार कार्यक्रमामुळे बाधित होणा-या विस्थापितांच्या पुनर्वसनाकरीता प्राधिकरणाने स्वत:च्या मालकीची चितळसर-मानपाडा-ठाणे येथील ५५४५१.०३ चौ. मी. जमीन ठाणे महानगरपालिकेस हस्तांतरीत केली होती. ठाणे महानगरपालिका सदर जमीन हस्तांतरणाचा मोबदला प्राधिकरणास

देण्यास असमर्थ असल्याने ठाणे महानगरपालिकेने जमीनीच्या मोबदल्या ऐवजी प्राधिकरणास TDR हस्तांतरीत केलेला आहे. सन २०२०-२१ या आर्थिक वर्षात TDR विकुन रु.४५६.४० कोटी इतके उत्पन्न अपेक्षित धरण्यात आलेले होते. परंतु सदर वर्षात TDR विकण्यात आला नसल्याने माहे जानेवारी, २०२१ पर्यंत सदर लेखाशीर्षाखाली कोणतीही रक्कम प्राप्त झाली नाही. त्यामुळे सन २०२०-२१ च्या सुधारीत अर्थसंकल्पात सदर लेखाशिर्षाखाली कोणतीही तरतूद करण्यात आलेली नाही.

तसेच सन २०२१-२२ च्या अर्थसंकल्पीय वर्षात TDR विक्रीपोटी रु.४५६.४०/कोटी उत्पन्न अपेक्षित आहे. त्यामुळे TDR विक्रीपोटी सन २०२१-२२ या वर्षात रु.४५६.४० कोटीची तरतूद प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

## ६. नागरी परिवहन निधी (UTF) :-

(रुपये कोटीत)

| | अर्थसंकल्पातील तरतूद | | |
|---|---|---|---|
| | २०२०-२१ | २०२०-२१ (सुधारीत) | २०२१-२२ |
| **नागरी परिवहन निधी** | **१५१०.००** | **१२००.००** | **५००.००** |

शासन निर्णय क्र.एमआरडी-३३१६/प्र.क्र.४१/नवि-७, दिनांक २५ ऑक्टोबर, २०१६ मधील क्र. २१ अन्वयें प्राधिकरणास वाढीव चटई क्षेत्र निर्देशांक, विकास शुल्क, मुद्रांक अधिभार, वाणिज्यिक विकसनद्वारे प्राप्त होणारे उत्पन्न, तसेच केंद्र शासनाकडून अंशदान स्वरुपात प्राप्त होणारे उत्पन्न व इतर विविध स्त्रोतामधून प्राप्त होणारा निधी हा प्राधिकरणाने त्यांच्या स्तरावर एक समर्पित नागरी परिवहन निधी स्थापन करावा व त्याचा विनियोग मेट्रो प्रकल्पासाठी राज्य शासनाच्या वतीने लागणा-या समभागाची प्राधिकरणाकडे रक्कम वर्ग करण्यास तसेच कर्जाच्या परतफेडीसाठी निधी अपुरा पडल्यास त्याचा उपयोग करावा. वरील सर्व स्त्रोतातुन सन २०२०-२१ या अर्थसंकल्पीय वर्षात रु.१५१०.०० कोटी इतकी रक्कम प्राप्त होईल असे अपेक्षित होते. परंतु चालु वर्षात कोणतीही रक्कम शासनाकडून प्राप्त झालेली नाही. शासनाने मुद्रांक शुल्कात वाढ केली असून हा अतिरिक्त महसूल शासनाकडे प्राप्त झालेला आहे. शासनाकडून प्राधिकरणाकडे हा महसूल वर्ग करण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच मेट्रो प्रकल्पासाठी इतर स्त्रोत – विकास शुल्क, सार्वजनिक परिवहन उन्मुख विकास या संबंधीचे निर्णयही सत्वर होणे आवश्यक आहे. याबाबत प्राधिकरणामार्फत पाठपुरावा करण्यात येत आहे. सुधारीत अर्थसंकल्पात रु.१२००.०० कोटीची तरतूद दाखविण्यात आलेली आहे. तसेच सन २०२१-२२ या वर्षात सर्व निधीचे स्त्रोत प्राधिकरणास उपलब्ध होईल ही बाब विचारात घेऊन सदर लेखाशिर्षाखाली रु.५००.०० कोटी तरतूद प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

## खर्च (अर्थसंकल्प भाग — २)

२०२०-२०२१ वर्षाचे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक व सन २०२०-२१ चे सुधारीत अंदाजपत्रक यामधील अपेक्षित खर्चाचा विचार करता त्यामध्ये रु.५९६७.५३ कोटीची कपात दिसून येत आहे. सन २०२१-२२ या वर्षाचे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक व सन २०२०-२१ चे सुधारीत अंदाजपत्रक आणि २०२०-२१ या वर्षाच्या अर्थसंकल्पात अंदाजपत्रकाचा सारांश खालील तक्त्यात दर्शविण्यात येत आहे.

(रुपये कोटीत)

| लेखा शीर्षक | अर्थसंकल्पीय अंदाज २०२०-२१ | सुधारीत अंदाज २०२०-२१ | तफावत | | अर्थसंकल्पीय अंदाज २०२१-२२ |
|---|---|---|---|---|---|
| १. प्रशासकीय खर्च (अनुसूची - १) | ४७३.८५ | ४२९.७५ | (-) | ४४.१० | ४९१.१५ |
| २. इमारत / संगणक खरेदी / फर्निचर इ. (अनुसूची २) | ८०.९५ | २८.१० | (-) | ५२.८५ | ५७.४५ |
| ३. कर्जे व अग्रीम (अनुसूची - ३) | ३०४.७० | ३१७.०५ | (+) | १२.३५ | २७३.२० |
| ४. सर्वेक्षणे/अभ्यास (अनुसूची - ४) | ५४.७० | २८.४६ | (-) | २६.२४ | ३४.९० |
| ५. अनुदाने (अनुसूची - ५) | १६३.७५ | २४९.२५ | (+) | ८५.५० | १४०.४५ |
| ६. प्रकल्पावरील खर्च (अनुसूची - ६) | १४७४१.५० | ८७९९.३१ | (-) | ५९४२.१९ | ११९७२.२० |
| **एकूण :-** | **१५८१९.४५** | **९८५१.९२** | (-) | **५९६७.५३** | **१२९६९.३५** |

**खर्चाच्या कपातीची / वाढीची कारणे :-**

**१. प्रशासकीय खर्च :-**

(रुपये कोटीत)

| | अर्थसंकल्पातील तरतूद | | |
|---|---|---|---|
| | २०२०-२१ | २०२०-२१ (सुधारीत) | २०२१-२२ |
| **प्रशासकीय खर्च** | **४७३.८५** | **४२९.७५** | **४९१.१५** |

सन २०२०-२१ च्या अंदाजपत्रकामध्ये प्रशासकीय व आस्थापनेवरील खर्चासाठी रु.४७३.८५ कोटीची तरतूद करण्यात आली होती. यामध्ये वेतन व भत्ते, कर्मचारी कल्याणकारी खर्च, भाडे व कर, दुरुत्या व परिरक्षण, जाहिरात, कर्जावरीज व्याज, मोनोरेल परिरक्षण, मेट्रो रेल परिरक्षण, सुरक्षा खर्च आणि इतर प्रशासकीय खर्चाचा समावेश आहे. माहे जानेवारी, २०२१ पर्यंत झालेल्या खर्चाचा विचार करता सुधारीत अंदाजपत्रकात वेतन व भत्ते, मोनो रेल व मेट्रो रेल परिरक्षण खर्च, प्राधिकरणाच्या जमिनीची सुरक्षा, मोटारगाडयावरील खर्च आणि इतर प्रशासकीय खर्चासाठी रु.४२९.७५कोटीची तरतूद सुचविण्यात आलेली आहे.

सन २०२१-२२ च्या अर्थसंकल्पात प्रशासकीय खर्चाकरीता रु.४९१.१५ कोटीची तरतूद प्रस्तावित करण्यात आलेली आहे. त्यामध्ये प्रामुख्याने वेतनावरील खर्च, कल्याणकारी योजनेवरील खर्च तसेच मेट्रो व मोनोरेलच्या दुरुस्ती व देखभालीचा खर्च याचा समावेश आहे.

२. **इमारत / संगणक खरेदी / फर्निचर इ :-**

(रुपये कोटीत)

| | अर्थसंकल्पातील तरतूद | | |
|---|---|---|---|
| **इमारत / संगणक खरेदी / फर्निचर इ. खर्च** | **२०२०-२१** | **२०२०-२१ (सुधारीत)** | **२०२१-२२** |
| | **८०.९५** | **२८.१०** | **५७.४५** |

सन २०२०-२१ च्या अर्थसंकल्पात भांडवली खर्च व कर्मचा-यांना अग्रीमासाठी रु.८०.९५ कोटीची तरतूद केली होती. त्यामध्ये नवीन कार्यालयीन इमारत तसेच कर्मचारी निवासस्थान, प्रशिक्षण केंद्राची इमारत, प्राधिकरणाच्या इमारतीची दुरुस्ती, नवीन वाहनांची, संगणक तसेच उपकरणांची खरेदी, फर्निचर व फिक्चर्स तसेच कर्मचा-यांना घर बांधणीसाठी/संगणकासाठी अग्रीम यांचा समावेश होता. माहे जानेवारी, २०२१ पर्यंत झालेल्या खर्चाचा विचार करता सुधारीत अर्थसंकल्पामध्ये वरील बाबी विचारात घेऊन त्याकरीता रु.२८.१० कोटीची तरतूद सुचविण्यात आलेली आहे. या वर्षात प्राधिकरणाच्या नवीन प्रशासकीय इमारतीकरीता रु.१०.२० कोटी तसेच कार्यालयीन सामुग्री जसे संगणक व सॉफ्टवेअर खरेदी याकरीता रु.२७.४५ कोटी तसेच कर्मचा-यांना द्यावयाच्या घर बांधणी कर्ज व अग्रीम इत्यादीचाही समावेश आहे. सन २०२१-२२ या आर्थिक वर्षामध्ये रु.५७.४५कोटीची तरतूद प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

३. **कर्जे व अग्रीम इत्यादी :-**

(रुपये कोटीत)

| | अर्थसंकल्पातील तरतूद | | |
|---|---|---|---|
| **स्थानिक संस्थांना कर्जे / इतर** | **२०२०-२१** | **२०२०-२१ (सुधारीत)** | **२०२१-२२** |
| | **३०४.७०** | **३१७.०५** | **२७३.२०** |

मुंबई महानगर प्रदेशातील पायाभूत सुविधामध्ये सुधारणा करण्याकरीता प्राधिकरणाकडून विविध प्रकल्पांसाठी स्थानिक संस्थांना कर्जे देण्यात येतात. सन २०२०-२१ या आर्थिक वर्षात विविध प्रकल्पाच्या कर्ज वितरणासाठी रु.३९.६० कोटीची तरतूद करण्यात आली होती. त्यामध्ये महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना सुर्या प्रकल्पाकरीता रु.२.५५ कोटी, वाहतूकीच्या कामाकरीता विविध संस्थांना रु.१.०० कोटी व इतर प्रकल्पांना कर्जे रु.३६.०५ कोटी याचा समावेश आहे. तथापि, स्थानिक संस्थाकडून कर्जाची मागणी येण्याची शक्यता नसल्याने माहे मार्च, २०२१ पर्यंत वितरीत होणा-या कर्जाचा विचार करता सुधारीत अर्थसंकल्पात काहीही तरतूद कर्जापोटी करण्यात आलेली नाही.

सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात मुंबई महानगर प्रदेशातील नागरी मुलभूत सुविधामध्ये सुधारणा करण्याकरीता प्राधिकरणाकडून विविध प्रकल्पांसाठी स्थानिक संस्थांना कर्जे देण्यासाठी रु.२२.६५ कोटीची तरतूद करण्यात आली आहे. मूलभूत सुविधांकरीता स्थानिक संस्था, महामंडळे यांना आर्थिक सहाय्य म्हणून देण्यात येणा-या कर्जाची माहिती खालील तक्त्यात देण्यात येत आहे :

(रुपये कोटीत)

| क्र. | संस्था/प्रकल्पाचे नाव | रक्कम |
|---|---|---|
| १. | वाहतुकीच्या मुलभूत कामाकरीता विविध संस्थांना कर्जसहाय्य | १.०० |
| २. | इतर प्रकल्पांना कर्जे | २१.६५ |
| | **एकूण :-** | **२२.६५** |

सन २०२०-२१ या वर्षात नोंदणी/इसारा/अनामत रक्कमेची परतफेड व मेगासिटी कर्जाची परतफेड या करीता रु.२६५.१० कोटीची तरतूद करण्यात आली होती. तथापि, या वर्षात जानेवारी, २०२१ अखेरपर्यंत रु.२७४.७५ कोटी इतक्या रकमेची परत फेड करण्यात आलेली आहे. याचा विचार करता सुधारीत अंदाजपत्रकात रु.३१७.०५ कोटीची तरतूद करण्यात आलेली आहे. तसेच पुढील वर्षाच्या अर्थसंकल्पात सदर लेखाशीर्षास्तव रु.२५०.५५ कोटीची तरतूद प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

४. **<u>सर्वेक्षणे/अभ्यास :-</u>**

(रुपये कोटीत)

| | अर्थसंकल्पातील तरतूद | | |
|---|---|---|---|
| | **२०२०-२१** | **२०२०-२१ (सुधारीत)** | **२०२१-२२** |
| **सर्वेक्षण/अभ्यास** | **५४.७०** | **२८.४६** | **३४.९०** |

सन २०२०-२१ या आर्थिक वर्षात सर्वेक्षणे/अभ्यास या लेखाशीर्षाखाली रु.५४.७० कोटीची तरतूद करण्यात आली होती. त्यामध्ये परिवहन व इतर क्षेत्रातील सल्लागार, सर्वेक्षणे व अभ्यास याकरीता रु.७.८५ कोटी, मुंबई महानगर प्रदेशात एकात्मिक परिवहन व व्यावसायिक केंद्राचा विकास करणे याकरीता रु.३.०० कोटी, राष्ट्रीय संशोधन व प्रशिक्षण संस्थाकरीता रु.०.१० कोटी, मेट्रो मार्ग सविस्तर अहवाल रु.०.४० कोटी, मेट्रो मार्गाचा अभ्यास रु.६.०५ कोटी, सार्वजनिक परिवहन उन्मुख विकास रु.५.०० कोटी, शहरी परिवहन निधी रु.०.०५ कोटी, वडाळा येथील मोनोरेल आगाराचा वाणिज्यिक विकास रु.०.२५ कोटी, प्रादेशिक माहिती यंत्रणेसाठी रु.१.०० कोटी, प्रादेशिक

योजनेच्या अंमलबजावणीचे सनियंत्रण रु.१.०० कोटी, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्राबाहेरील विकास योजनेकरीता रु.१.०० कोटी व भिवंडी परिसरातील विकास योजना रु.१.०० कोटी, माहिती व तंत्रज्ञान याकरीता रु.७.०० कोटी, आंतरराष्ट्रीय वित्त सेवा केंद्र योजना रु.१.९५ कोटी, अंबरनाथ, कुळगांव-बदलापूर क्षेत्रासाठी विकास योजना रु.०.०५ कोटी, बॅकबे पुन:प्रारण क्षेत्राच्या सुधारीत विकास आराखडा तयार करण्याकरीता रु.५.०० कोटी, मुंबई शहरातील व मुंबई महानगर क्षेत्रातील मिठागरांच्या जमिनीचा बृहत आराखडा रु.१०.०० कोटी, मुंबई विद्यापिठाच्या कलिना परिसराचा बृहत आराखडा रु.३.०० कोटी, वाहनांच्या पुर्नवापराकरीता कारखान्याची अंमलबजावणीसाठी सविस्तर प्रकल्प अहवाल रु.१.०० कोटी इत्यांदीच्या अभ्यासासाठी तरतूद करण्यात आली होती. यामध्ये बहूतेक तरतूदी या लाक्षणिक स्वरुपाच्या करण्यात येत असतात. सदरहू सर्वेक्षणे/अभ्यासावर माहे जानेवारी, २०२१ पर्यंत रु.५.६१ कोटी इतकाच खर्च झालेला आहे. त्यामुळे सुधारीत अर्थसंकल्पामध्ये रु.२८.४६ कोटीची तरतूद प्रस्तावित केली आहे.

सन २०२१-२२ च्या अर्थसंकल्पामध्ये रु.३४.९० कोटीची तरतूद करण्यात आली आहे. त्यामध्ये परिवहन व इतर क्षेत्रातील सल्लागार, सर्वेक्षणे व अभ्यासासाठी रु.६.४५ कोटी, मुंबई महानगर प्रदेशात एकात्मिक परिवहन व व्यवसायिक केंद्राचा विकासासाठी (ISBT) रु.१.०० कोटी, राष्ट्रीय संशोधन व प्रशिक्षण संस्था रु.०.०५ कोटी, बँकबे पुन:प्रारण क्षेत्राच्या ब्लॉक ३ ते ६ साठी सुधारीत विकास आराखडासाठी रु.२.०० कोटी, सार्वजनिक परिवहन उन्मुख विकास रु.५.०० कोटी, शहरी परिवहन निधी रु.०.०५ कोटी, प्रादेशिक माहिती यंत्रणा व प्रादेशिक योजनेची अंमलबजावणीसाठी रु.१.५० कोटी, भिवंडी परिसरातील विकास योजना रु.१.०० कोटी, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्राबाहेरील विकास योजनांसाठी रु.१.०० कोटी, अंबरनाथ, कुळगाव-बदलापुर क्षेत्रासाठी विकास योजना रु.०.०५ कोटी, माहिती व तंत्रज्ञान योजना रु.७.०० कोटी, आंतरराष्ट्रीय वित्त सेवा केंद्र उभारणे रु.१.९५ कोटी, मेट्रो बृहत आराखडयातील मेट्रो मार्गाचे पुर्नविलोकन व अद्यावतीकरण आणि अभ्यास रु.४.६५ कोटी, मिठागरांच्या जमिनींचा बृहत आराखडा रु.१.०० कोटी, मुंबई विद्यापिठाच्या कलिना परिसराचा बृहत आराखडा रु.१.२० कोटी व वाहनांच्या पुर्नवापराकरीता कारखान्याची अंमलबजावणीसाठी सविस्तर प्रकल्प अहवाल रु.१.०० कोटी इत्यादीचा समावेश आहे.

५. <u>अनुदाने :-</u>

(रुपये कोटीत)

| | अर्थसंकल्पातील तरतूद | | |
|---|---|---|---|
| | २०२०-२१ | २०२०-२१ (सुधारीत) | २०२१-२२ |
| अनुदाने | १६३.७५ | २४९.२५ | १४०.४५ |

सन २०२०-२१ मध्ये अनुदानासाठी रु.१६३.७५ कोटी इतकी तरतूद करण्यात आली होती. यामध्ये एकात्मिक ग्राम विकास योजनेखाली रु.२.०० कोटीची तरतूद करण्यात आली होती. परंतू संबंधीत जिल्हा परिषदांकडून मागणी प्राप्त झालेली नसल्यामुळे अपेक्षित खर्च करण्यात आला नाही. त्यामुळे सुधारीत अर्थसंकल्पात तरतूद प्रस्तावित करण्यात आली नाही. प्रादेशिकदृष्टया महत्वाचे प्रकल्प यावर रु.४.९५ कोटीची तरतूद मुळ अर्थसंकल्पात करण्यात आली होती. तथापि, माहे जानेवारी, २०२१ पर्यंत काहीही खर्च झालेला नसल्याने सुधारीत अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आलेली नाही. मुंबई महानगर प्रदेशातील बाह्यरस्ते सुधारणा याकरीता रु.१५०.०० कोटीची तरतूद मूळ अर्थसंकल्पात करण्यात आली होती. तथापि, माहे जानेवारी, २०२१ पर्यंत रु.४१.५१ कोटी अनुदान संबंधीत संस्थांना वितरीत करण्यात आले आहे. तसेच माहे मार्च २०२१ पर्यंत एकूण रु.१०८.४९ कोटी अनुदान वितरीत करावयाचे आहे. तसेच सुधारीत तरतूद रु.१९७.१५ कोटी करण्यात आली आहे. कोविड-१९ या विषाणूमुळे उद्भवलेल्या वैश्विक महामारी निमित्त ठाणे महानगरपालिकेस कोविड रुग्णालय उभारणीकरीता रु.२४.९९ कोटी इतके अनुदान चालु वर्षात वितरीत करण्यात आले आहे. त्यामुळे रु.२५.०० कोटी इतकी रक्कम सन २०२०-२१ च्या सुधारीत अर्थसंकल्पामध्ये दर्शविण्यात आली आहे. महाराष्ट्र निसर्ग उद्यान संस्थेस रु.४.०० कोटी अनुदानाची तरतूद मुळ अर्थसंकल्पामध्ये करण्यात आली होती. जानेवारी, २०२१ पर्यंत रु.२.०१ कोटी इतके अनुदान महाराष्ट्र निसर्ग उद्यान संस्थेस देण्यात आले आहे. त्यामुळे सन २०२०-२१ च्या सुधारीत अर्थसंकल्पात सदर लेखाशीर्षाखाली रु.३.५० कोटीची तरतूद करण्यात आलेली आहे. विस्तारीत मुंबई पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत महानगरपालिका/ नगरपालिकांना अर्थ सहाय्य देण्याकरीता माहे जानेवारी, २०२१ अखेरपर्यंत रु.६.४३ कोटी अनुदान दिलेले आहे. विविध संस्थाच्या मागणीचा विचार करता रु.२२.८० कोटीची सुधारित तरतूद प्रस्ताविलेली आहे. वांद्रे कुर्ला संकुल व वडाळा ट्रक टर्मिनल येथे CCTV करीता मुळ अर्थसंकल्पात रु.०.८० कोटीची तरतूद करण्यात आली होती. माहे जानेवारी, २०२१ पर्यंत या लेखाशिर्षाखाली खर्च झालेला नाही. त्यामुळे सुधारीत तरतूद ०.८० कोटी करण्यात आली आहे. अनुदानापोटी एकूण रु.२४९.२५ कोटीची सुधारीत तरतूद दाखविण्यात आली आहे.

सन २०२१-२२ च्या अर्थसंकल्पामध्ये विविध प्रकल्पांकरीता अनुदान देण्यासाठी म्हणून रु.१४०.४५ कोटी इतकी रक्कम प्रस्तावित करण्यात आली आहे. त्यामध्ये एकात्मिक ग्राम विकास योजना रु.०.५० कोटी, प्रादेशिकदृष्टया महत्वाचे प्रकल्प रु.५.१५ कोटी, मुंबई महानगर प्रदेशातील बाहय रस्ते सुधारणा याकरीता रु.११०.०० कोटी, महाराष्ट्र निसर्ग उद्यान संस्थेस रु.४.०० कोटी, वांद्रे कुर्ला संकुल व वडाळा ट्रक टर्मिनल येथे CCTV करीता रु.०.८० कोटी व विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत महानगरपालिका/नगरपालिकांना अनुदान म्हणून रु.२०.०० कोटीची तरतूद करण्यात आलेली आहे.

६. प्रकल्पावरील खर्च :-

(रुपये कोटीत)

| | अर्थसंकल्पातील तरतूद | | |
|---|---|---|---|
| | २०२०-२१ | २०२०-२१ (सुधारीत) | २०२१-२२ |
| प्रकल्पाची अंमलबजावणी | १४७४१.५० | ८७९९.३१ | ११९७२.२० |

प्राधिकरणामार्फत राबविण्यात येणा-या प्रकल्पांवर २०२०-२१ या वर्षामध्ये रु.१४७४१.५० कोटी इतक्या रकमेची तरतूद करण्यात आली होती. त्यामध्ये वर्सोवा-अंधेरी-घाटकोपर या सामूहिक जलद परिवहन व्यवस्था अंमलबजावणी व भूसंपादन रु.९८.४० कोटी, मोनो रेल प्रकल्पाकरीता-भूसंपदानासह रु.१३२.४० कोटी, माथेरान फ्युनिकुलर रेल्वे रु.१.०० कोटी विविध मेट्रो लाईन करीता रु.६०३७.९० कोटी, मेट्रो भवन करीता रु.१००.०० कोटी, मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनला निधी हस्तांतरीत करुन कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो करण्याकरीता रु.६००.०० कोटी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक रु.२००.०० कोटी, भाडेतत्वावर निवासस्थाने बांधणे रु.८९.०० कोटी, तसेच वांद्रे-कुर्ला संकुलाच्या विकासासाठी रु.१००.०० कोटी, ओशिवरा जिल्हा केंद्राचे विकसन रु.१०.५० कोटी, मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प अंमलबजावणी – भूसंपादनासह रु.१२४.१५ कोटी, विस्तारीत मुंबई पायाभूत सुविधा प्रकल्प – भूसंपादनासह रु.९५०.०० कोटी, मिठी नदी व वाकोला नाल्याचे शुध्दीकरण रु.८.०० कोटी, वडाळा ट्रक टर्मिनल बांधकाम रु.१०.०० कोटी, मुंबई पारबंदर छन्नमार्ग अंमलबजावणी रु.२९००.०० कोटी (MTHL), पुनर्वसन व पुनर्वसाहत सुविधा करीता रु.२५.०० कोटी, वरळी ते शिवडी उन्नत मार्ग रु.१००.०० कोटी, ध्वनी प्रदुषण नियंत्रक भिंतीचे बांधकाम रु.०.२० कोटी, विरार ते अलिबाग या बहुविध छन्नमार्गाचा विकास– भूसंपादनासह रु.१०००.०० कोटी, मुंबई महानगर प्रदेशात बाहय रस्ते सुधारणा रु.१०५.०० कोटी, सांताक्रुझ-चेंबूर जोडरस्त्याचे विस्तारीकरण रु.१५०.०० कोटी, छेडानगर-घाटकोपर येथील वाहतुक सुधारणा रु.८०.०० कोटी, प्रादेशिक स्तरावर जलस्त्रोतांचा विकास रु.३९९.०० कोटी, पुर्व द्रुतगती महामार्गाची दुरुस्ती व देखभाल याकरीता रु.१००.०० कोटी पश्चिम द्रुतगती महामार्गावरील दुरुस्ती व देखभाल रु.१००.०० कोटी, वडाळा भारवाहक तळ येथील नियोजित इमारतीचे बांधकाम रु.५.०० कोटी, UMATA करीता रु.३५.०० कोटी व इतर किरकोळ प्रकल्पांवर रु.१०८०.९५ कोटी इत्यादी प्रकल्पांचा समावेश होता.

मेट्रो प्रकल्पांची प्रत्यक्ष कामे या वर्षात अपेक्षेप्रमाणे झालेली नाहीत. त्यामुळे सदर कामांचा बांधकाम खर्च रक्कमेत घट झाली आहे. तसेच कलानगर येथील उड्डाणपूल, ओशिवरा येथील विविध विकास कामे, मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प – विस्तारीत MUIP या प्रकल्पासाठी भूसंपादन व विविध सेवावाहिन्यांचे स्थलांतरण इ. कामे

तसेच MTHL, विरार ते अलिबाग बहुविध मार्ग इ. प्रकल्पांचे काम अपेक्षेप्रमाणे न झाल्याने या वर्षात खर्च कमी होईल असे अपेक्षित आहे.

सन २०२०-२१ या वर्षात एमयुटीपी या प्रकल्पासाठी रु.२००.०० कोटीची तरतूद करण्यात आलेली होती. शासनाने या प्रकल्पाच्या सुधारीत अंदाजपत्रकास मान्यता दिलेली आहे. माहे जानेवारी, २०२१ पर्यंत एमआरव्हीसीने कुठलाही रक्कमेची प्रतिपूर्ती मागितलेली नाही. माहे मार्च, २०२१ पर्यंत खर्चाच्या प्रतिपूर्तीची मागणी करेल हे विचारात घेऊन सुधारीत अंदाजपत्रकात सदर लेखाशीर्षातंर्गत रु.१००.०० कोटीची तरतूद करण्यात आली आहे.

माहे जानेवारी, २०२१ अखेर या सर्व प्रकल्पांवर रु.६४१२.३३ कोटी इतका खर्च झालेला आहे. माहे फेब्रुवारी ते मार्च, २०२१ या महिन्यातील अपेक्षित खर्च विचारात घेता सर्व प्रकल्पांसाठी सुधारित अर्थसंकल्पामध्ये रु.८७९९.३१ कोटी इतकी तरतूद करण्यात आली आहे.

सन २०२१-२२ च्या अर्थसंकल्पामध्ये प्रकल्पावरील खर्चासाठी रु.११९७२.२० कोटींची तरतूद प्रस्तावित केली आहे. त्यामध्ये मुख्यत: मागील वर्षाच्या अपूर्ण राहिलेल्या योजनांचा तसेच काही नवीन योजनांचा समावेश आहे. शासनाने मुं.म.प्र.वि.प्राधिकरण अधिनियमाच्या कलम १७ मध्ये सुधारणा केली आहे. यापुढे या सुधारणेन्वयें नागरी मुलभूत सुविधा पुरविण्याची अंशत: जबाबदारी प्राधिकरणाकडे सोपविण्यात आली आहे. तसेच शासनाने मेट्रो, एमटीएचएल इ. मोठया पायाभूत सुविधा प्रकल्पासाठी प्राधिकरणाची कार्यान्वयीन संस्था म्हणून नियुक्ती केलेली आहे. सन २०२१-२२ च्या अर्थसंकल्पात प्रकल्प व योजनांवरील खर्च पुढील तक्त्यात दर्शविण्यात येत आहे.

(रुपये कोटीत)

| अ.क्र. | योजनेचे नाव | रक्कम |
|---|---|---|
| १. | मुंबई मेट्रो रेल्वे प्रकल्प — वर्सोवा-अंधेरी-घाटकोपर (MRTS) भूसंपदानासह | ८४.८० |
| २. | मोनो रेल प्रकल्प - भूसंपदानासह | १२०.२० |
| ३. | एकीकृत मुंबई महानगर परिवहन प्राधिकरणाचे अंतर्गत (UMMTA) ITS आणि इतर प्रकल्प | ०.५० |
| ४. | मेट्रो मार्ग ७ उन्नत पादचारी मार्गांचे बांधकाम करण्यासाठी अभियांत्रिकी संरचना, प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नियुक्ती व प्रकल्प अंमलबजावणी. | १००.०० |
| ५. | कांजूरमार्ग ते बदलापूर या मार्गाकरीता योग्य जलद परिवहन सेवेची अंमलबजावणी | १०.०० |
| ६. | पश्चिम द्रुतगती महामार्गावर प्रवेश नियंत्रण शहरी संरेखन, वाहतूक प्रणाली संरेखन तसेच मुंबईत वाढील वाहतुकीसाठी सिग्नल फ्री जंक्शन (Access control system on WEH) आणि अंमलबजावणी | ५०.०० |
| ७. | सिटी पार्क ते महाराष्ट्र निसर्ग उद्यान दरम्यान पादचारी झुलता पुल | ७७.०५ |
| ८. | मेट्रो प्रकल्प मार्ग २ अ : दहिसर-चारकोप-मानखुर्द (दहिसर ते डी.एन.नगर अंधेरी) | ७००.६५ |
| ९. | मेट्रो प्रकल्प २ ब : डी. एन. नगर ते मंडाळे | ४७३.५५ |
| १० | मेट्रो प्रकल्प ३ : कुलाबा - वांद्रे - सीप्झ (मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन) | २५०.०० |
| ११. | मेट्रो प्रकल्प ४ : वडाळा - घाटकोपर - मुलुंड - ठाणे - कासारवडवली | ८९०.८५ |
| १२. | मेट्रो प्रकल्प ४ अ : कासारवडवली - गायमुख | १७६.७० |

| | | |
|---|---|---|
| १३. | मेट्रो प्रकल्प ५ : ठाणे - भिवंडी — कल्याण | ३१८.०५ |
| १४. | मेट्रो प्रकल्प ६ : स्वामी समर्थ नगर - JVLR - सीप्झ् - कांजुरमार्ग - विक्रोळी EEH | ४००.१० |
| १५. | मेट्रो प्रकल्प ७ : अंधेरी — पूर्व ते दहिसर — पूर्व | ९९९.४५ |
| १६. | मेट्रो प्रकल्प - मार्ग - ९ : दहिसर ते मिरा-भाईंदर व ७ अ (अंधेरी ते छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ) | ३२०.१० |
| १७. | मेट्रो प्रकल्प १० : गायमुख - शिवाजी चौक (मिरा रोड) | ११.०० |
| १८. | मेट्रो प्रकल्प ११ : वडाळा- छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस | १७.०५ |
| १९. | मेट्रो प्रकल्प १२: कल्याण — डोंबिवली — तळोजा | १२.०० |
| २०. | मेट्रो प्रकल्प १३ : घोडबंदर - विरार | १.७५ |
| २१. | मेट्रो भवन | ८४.०० |
| २२. | मेट्रो - कर्मचारी निवासस्थाने | ३१.०० |
| २३. | महा मुंबई मेट्रो संचलन महामंडळ (M३) | २४४.३० |
| २४. | पायाभूत सोयीसुविधासह मुंबई महानगर क्षेत्रात भाडेतत्वावर निवासस्थाने बांधणे | १०४.९० |
| २५. | वांद्रे-कुर्ला संकुलात सुधारणा व नागरी सुविधा | ६०.०० |
| २६. | ओशिवरा जिल्हा केंद्राचे विकसन | १०.०० |
| २७. | मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प (भू-संपादनासह) | १२४.५० |
| २८. | विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प राबविणे (भू-संपादनासह) | ७७६.८५ |
| २९. | स्व.बाळासाहेब ठाकरे यांचे राष्ट्रीय स्मारक उभारणे | १००.०० |
| ३०. | वडाळा ट्रक  टर्मिनल बांधकाम | १०.०० |
| ३१. | मुंबई पारबंदर छन्नमार्ग (शिवडी ते न्हावा शेवा) | २९००.३५ |
| ३२. | पुनर्वसन व पुनर्वसाहत सुविधा | २०.०० |
| ३३. | वरळी ते शिवडी उन्नत मार्ग | १००.०० |
| ३४. | टिकुजीनीवाडी (ठाणे) ते संजय गांधी राष्ट्रीय उद्यान (बोरीवली) ६पदरी भुयारी मार्ग | १००.०० |
| ३५. | मुंबई महानगर प्रदेशातील बाहय रस्ते सुधारणा | १४०.०० |
| ३६. | सांताक्रुझ-चेंबूर जोडरस्ता—विस्तारीत तसेच वांद्रे-कुर्ला संकुल ते पश्चिम द्रुतगती महामार्गापर्यंत उन्नत मार्ग बांधणे | २००.०० |
| ३७. | अंधेरी-घाटकोपर जोडरस्स्त्यावरील नरसी मेहता रस्त्यावर जागृती नगर मेट्रो स्थानकाखाली पुलाचे बांधकाम | ८.८५ |
| ३८. | पुर्व द्रुतगती महामार्गावरील छेडानगर जंक्शन, घाटकोपर — पूर्व येथील उन्नत मार्ग सुधारणा | ६०.०० |
| ३९. | पुर्व व पश्चिम द्रुतगती महामार्गाची देखभाल व दुरुस्ती | २००.०० |
| ४०. | वडाळा भारवाहक तळ येथील इमारतीचे बांधकाम | ७.०० |
| ४१. | राष्ट्रीय सुरक्षा गास्दे (NSG) जोगेश्वरी येथे मिठी नदीवरील पुल | ५.०० |
| ४२. | इंदू मिल येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भव्य स्मारक बांधणे | २२८.६० |
| ४३. | प्रादेशिक स्तरावर जलस्त्रोताचा विकास - सुर्या प्रादेशिक पाणी पुरवठा योजना | ६१३.३५ |
| ४४. | वांद्रे कुर्ला संकुलाचे सुशोभिकरण / विकास | ४०.०० |
| ४५. | मुंबई नागरी परिवहन प्रकल्प (भू-संपादनासह) | ४०५.०० |
| ४६. | इतर संकीर्ण प्रकल्पांवरील तरतूद | ३८४.७० |
| | **एकूण :-** | **११९७२.२०** |

७. <u>आयकर :-</u>

